महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५
दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वे)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in
प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत कान्हेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**क्र. मु.अ.(वा)/लेखा/ग्रा.पं.दिवाबत्ती/५५/२०१६-१७/** 027040 **दिनांक :** 31 AUG 2016

**परिपत्रक क्र.** २३४

**विषय :-** ग्रामपंचायतीना रस्त्यावरील विजेच्या दिव्यांच्या वीज बिलांची रक्कम देण्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी अनुदानापोटी मंजुर केलेली रक्कम रु. १८२,४०,००,०००/- (रुपये एकशे ब्याऐंशी कोटी चाळीस लाख फक्त)

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्र. बीजीटी-२६०३/प्र.क्र.-१९९२/पंरा-४ दि.२२.०९.२००३.
२) शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१६/प्र.क्र.४१/वित्त-२ दि.०३.०६.२०१६.

---

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यांवरील दिवाबत्तीची विज देयके भागविण्यासाठी शासन ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देते. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता अनुदानासाठी रक्कम रुपये २२८,००,००,०००/- (रुपये दोनशे अठ्ठावीस कोटी फक्त) इतकी तरतुद शासकीय अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे, त्यापैकी रक्कम रुपये १८२,४०,००,०००/- (रुपये एकशे ब्याऐंशी कोटी चाळीस लाख फक्त) वरील संदर्भीय शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हानिहाय विवरण पत्रात दर्शविल्याप्रमाणे शासनाकडून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितलादि.०८.०७.२०१६ रोजी रोखीत प्राप्त झालेले आहेत.

शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हानिहाय विवरण पत्रातील रक्कमेचे, संबंधीत जिल्हयातील ग्रामपंचायतीच्या नावाने थकबाकीच्या प्रमाणात वर्ग करण्याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत करण्यात येत असून सदर रक्कम फक्त ग्रामपंचायत वीज दिव्यांच्या जोडण्यांनाच दर संकेताची नोंद संगणकात केली आहे, हे तपासून संबंधित क्षेत्रीय माहिती व तंत्रज्ञान विभागास कळविल्याची खात्री संबंधित बिलींग कक्षाने करावी.

थकबाकी पोटी समायोजित करण्यात आलेल्या रक्कमेचे (सन २०१६-१७) ग्रामपंचायत निहाय विवरण पत्राची एक प्रत संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच विभागीय आयुक्त व उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांच्यासह या कार्यालयास त्वरित पाठवावी.

**सोबत :** वरीलप्रमाणे

(स्वाक्षरी) 31.8.16
**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सविनय सादर :-**
संचालक (वित्त), म.रा.वि.वि.कं. मर्यादित, प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई.

**प्रत सस्नेह सादर :-**
१. सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्यादित, संवसु परिमंडळ कार्यालय.
२. मुख्य महाव्यवस्थापक / (सांघिक लेखा) /(निगम वित्त)/(माहिती तंत्रज्ञान) म.रा.वि.वि.कं. मर्यादित, मुंबई.
----माहिती व उचित कार्यवाहसाठी

**प्रत रवाना :**
१. सर्व अधिक्षक अभियंता, संवसु मंडळ कार्यालय, म.रा.वि.वि.कं. मर्यादित
२. महाव्यवस्थापक (अर्थोपाय विभाग), ३ रा मजला, हॉगकॉंग इमारत, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
३. सर्व कार्यकारी अभियंता, संवसु विभागीय कार्यालय, म.रा.वि.वि.कं. मर्यादित
४. सर्व उपकार्यकारी अभियंता / सहाय्यक अभियंता, संवसु उपविभागीय कार्यालय.
---- उचित कार्यवाहीसाठी.



Scanned by CamScanner

**अर्थसंकल्पीय अनुदान सन २०१६-२०१७**
**मागणी क्र. एल -५ लेखाशिर्ष ३६०४** - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे.२००इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे- (०१)(०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज बिलांची रक्कम देण्यासाठी ग्राम पंचायतीना १०० % अनुदान (३६०४०३२५) (दत्तमत)

# महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग

## शासन निर्णय क्रमांकः अर्थसं-२०१६/प्र.क्र. ४१ /वित्त-२

बांधकाम भवन इमारत- २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
तारीख: ०३ जून, २०१६

**वाचा -**

१) **शासन निर्णय क्रमांकः** ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीएम २०८५/सीआर १९४०/२२ दि . ३० जानेवारी, १९९०

२) **शासन निर्णय क्रमांकः** ग्राम विकास विभाग क्र. बीजीटी-२६०३/प्र.१९९२/पंरा-४ दि.२२ सप्टेंबर, २००३

**प्रस्तावना-**

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यांवरील दिवाबत्तीची वीज देयके भागविण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देण्यात येते. यासाठी सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाकरीता रु. २२८,००,००,०००/- (अक्षरी रुपये दोनशे अठ्ठावीस कोटी फक्त ) इतक्या रकमेची अर्थसंकल्पीय तरतूद केलेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची दिवाबत्तीची देयके त्वरित भागविण्यासाठी प्रशासकीय विभागांनी शासकीय अनुदानातून परस्पर सदर रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे भरणा करावी असा निर्णय शासनाने सन २००३ या वर्षी घेतलेला आहे.

**शासन निर्णय-**

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यांवरील दिवाबत्तीची वीज देयके भागविण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान (३६०४०३२५) या लेखाशिर्षाखाली सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाकरीता रु.२२८,००,००,०००/- (अक्षरी रुपये दोनशे अठ्ठावीस कोटी फक्त ) इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यांत आली आहे.

Scanned by CamScanner

२. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९/अर्थसंकल्प-३ दि. २० एप्रिल, २०१६ च्या परिपत्रकान्वये अर्थसंकल्पीय तरतुदीच्या ८० % च्या मर्यादेत वितरणास मान्यता देण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९/अर्थसंकल्प-३ दि. २० एप्रिल, २०१६ मधील परिच्छेद ७ ते १७ मधील सर्व अटी व शर्ती आणि परिशिष्ट मधील सर्व अटी व शर्तींची पुर्तता होत असल्याने अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी ८०% च्या मर्यादेत **रु. १८२,४०,००,०००/- (अक्षरी रुपये एकशे ब्याऐंशी कोटी चाळीस लक्ष फक्त )** इतके अनुदान अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS) उपलब्ध करुन देण्यास व वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर तरतूद सोबतच्या विवरणपत्रात जिल्हानिहाय दर्शविलेल्या विगतवारीप्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून ती आता या शासन निर्णयाव्दारे कार्यासन अधिकारी, रोखशाखा, ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, यांचे अधिनस्त ठेवण्यात येत आहे. सदरचा निधी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथून आहरित करुन वितरित करण्यासाठी त्यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी उपरोक्त मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाचा धनादेश महाराष्ट्र राज्य, विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांच्या नावाने अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथून काढावयाचा आहे. श्री. वि.म. राउत, कार्यासन अधिकारी, रोखशाखा यांच्या सहीने तयार केलेले व श्री. नं. म.शिंदे, सहसचिव (रोखशाखा) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले देयक अधिदान व लेखाकार्यालय, मुंबई यांचेकडे सादर करण्यात यावे.

३. या करीता **रु. १८२,४०,००,०००/- (अक्षरी रुपये एकशे ब्याऐंशी कोटी चाळीस लक्ष फक्त )** इतक्या अनुदानास मंजूरी देण्यात येत आहे. इतके अनुदान खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे.

अ) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांना दिलेल्या धनादेशाची रक्कम त्यांनी या शासन निर्णयासोबतच्या विवरण पत्रातील रकाना क्र. ३ मधील रक्कम त्या त्या जिल्हा परिषदांच्या अखत्यारीत असलेल्या ग्रामपंचायतीच्या रस्त्यावरील दिवाबत्तीच्या वीज देयकाच्या थकबाकीस अधीन राहून समायोजित करावी व तसा अहवाल शासनास सादर करावा.

ब) समायोजित केलेल्या रक्कमेबाबतचे स्वतंत्र विवरणपत्र महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांनी ठेवणे आवश्यक असून त्याची एक प्रत त्यांनी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना पाठवावयाची आहे. तसेच त्याची एक प्रत शासनालाही पाठवावयाची आहे.

क) वरील अटींची पूर्तता होत आहे याची खात्री करुन घेण्यासाठी महालेखापाल, महाराष्ट्र -१ , मुंबई आणि महालेखापाल , महाराष्ट्र -२, नागपूर यांना लेखापरिक्षणाकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांची पुस्तके व लेखा पाहणीचा अधिकार राहील. महालेखापाल



Scanned by CamScanner

यांना त्यांचे काम पार पाडण्याकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांनी सर्वतोपरी सहकार्य दिले पाहिजे.

ड) खर्चाचा मेळ घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांनी खर्चाची विवरणपत्रे विभागीय आयुक्तांना पाठवून त्याची एक प्रत शासनास पाठवावी.

विभागीय आयुक्तांनी शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्र. आरसीएन १०८९/प्र.क्र.३०२७/२८, दि. ०५.०९.१९९० मधील सूचनेप्रमाणे या अनुदानाच्या खर्चाचा महालेखापालांकडे नोंदलेल्या खर्चाबरोबर मेळ घालावा व अहवाल शासनाकडे पाठवावा.

३. उपरोक्त निधीबाबत नियंत्रक अधिकारी म्हणून श्री. नं. म. शिंदे, सहसचिव (रोखशाखा) ,ग्राम विकास व जलसंधारण विभाग हे राहतील .

४. या शासन निर्णयाव्दारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाएवढा खर्च मागणी क्र.एल-५, "३६०४" स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २०० इतर संकीर्ण नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१) (०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज बिलाची रक्कम देण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देणे (३६०४०३२५) (दत्तमत)-५० -इतर खर्च या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो उपरोक्त लेखाशिर्षाखाली सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षासाठी असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९/अर्थसंकल्प-३ दि. २० एप्रिल, २०१६ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(पां. रा. खोटरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई -४०० ००१ वर नमूद केल्याप्रमाणे तीन प्रतीत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई ४०० ००१
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई ४०० ००१
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर .
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,प्रकाशगड,वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ००५१
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित प्रकाशगड अनंत काणेकर मार्ग, वांद्रे ( पूर्व ) मुंबई ४०० ०५१.
मुख्य अभियंता (वाणिज्य), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड (वाणिज्य विभाग) ५ वा मजला, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१
अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य (अराप/रालेवि-१), मुंबई.
निवासी लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कपंनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई.
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा , कोकण भवन , वाशी , नवी मुंबई
उप लेखा परिक्षक , नवी मुंबई , वाशी /पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर
मुख्य अभियंता, विद्युत विभाग, महाराष्ट्र शासन, प्रशासकीय इमारत, ५९ रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर,मुंबई ४०० ०७१
अवर सचिव (उर्जा -३) उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
विभागीय आयुक्त (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारणविभाग (वित्त -१, वित्त- ७, वित्त -८)
कक्ष अधिकारी (रोखशाखा) ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई.३२.
वित्त विभाग (अर्थसंकल्प १७ /व्यय१५)मंत्रालय, मुंबई.३२.
निवडनस्ती ,वित्त-२ ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

Scanned by CamScanner

## विवरणपत्र

शासन निर्णय क्र अर्थसं-२०१६/प्र.क्र.- ४१ /वित्त-२, दिनांक: - ०३ जून, २०१६ चे विवरणपत्र

मागणी क्र. एल -५ लेखाशिर्ष ३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २००, इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे- (०१) (०३) रस्त्यांवरील विजेच्या दिव्यांच्या देयकांची रक्कम भरण्यासाठी ग्रामपंचायतीना १००% अनुदान (३६०४०३२५) (दत्तमत) -५० इतर खर्च.

(रुपये /हजारात)

| विभाग | अ.क्र. | जिल्हा | या शासन निर्णयान्वये वितरीत केलेले अनुदान | |
|---|---|---|---|---|
| कोकण | १ | ठाणे | ७१६८ | रुपये एकाहत्तर लक्ष अडुसष्ठ हजार फक्त |
| | २ | रायगड | २८८५३ | रुपये दोन कोटी अठ्ठयाऐंशी लक्ष त्रेपन्न हजार फक्त |
| | ३ | रत्नागिरी | ११३५१ | रुपये एक कोटी तेरा लक्ष एकावन्न हजार फक्त |
| | ४ | सिंधूदुर्ग | १३३१ | रुपये तेरा लक्ष एकतीस हजार फक्त |
| | ५ | पालघर | २७७९० | रुपये दोन कोटी सत्त्याहत्तर लक्ष नव्वद हजार फक्त |
| नाशिक | ६ | नाशिक | १४१११११ | रुपये चौदा कोटी अकरा लक्ष अकरा हजार फक्त |
| | ७ | धुळे | २७४७ | रुपये सत्तावीस लक्ष सत्तेचाळीस हजार फक्त |
| | ८ | नंदूरबार | २४५२ | रुपये चोवीस लक्ष बावन्न हजार फक्त |
| | ९ | जळगांव | १५०९६५ | रुपये पंधरा कोटी नऊ लक्ष पासष्ठ हजार फक्त |
| | १० | अहमदनगर | १५००१९ | रुपये पंधरा कोटी एकोणीस हजार फक्त |
| पुणे | ११ | पुणे | १२१५१९ | रुपये बारा कोटी पंधरा लक्ष एकोणीस हजार फक्त |
| | १२ | सातारा | ७५३४ | रुपये पंच्याहत्तर लक्ष चौतीस हजार फक्त |
| | १३ | सांगली | ४७३५ | रुपये सत्तेचाळीस लक्ष पस्तीस हजार फक्त |
| | १४ | सोलापूर | २२९१३४ | रुपये बावीस कोटी एक्याणव लक्ष चौतीस हजार फक्त |
| | १५ | कोल्हापूर | ६७२४ | रुपये सदुसष्ठ लक्ष चोवीस हजार फक्त |
| औरंगाबाद | १६ | औरंगाबाद | ९१६३४ | रुपये नऊ कोटी सोळा लक्ष चौतीस हजार फक्त |
| | १७ | जालना | ५७४०३ | रुपये पाच कोटी चौ-याहत्तर लक्ष तीन हजार फक्त |
| | १८ | परभणी | १७७७३ | रुपये एक कोटी सत्त्याहत्तर लक्ष त्र्याहत्तर हजार फक्त |
| | १९ | हिंगोली | २२३९१ | रुपये दोन कोटी तेवीस लक्ष एक्याण्णव हजार फक्त |
| | २० | बीड | ८९४ | रुपये आठ लक्ष चौ-याण्णव हजार फक्त |
| | २१ | नांदेड | २२०२०९ | रुपये बावीस कोटी दोन लक्ष नऊ हजार फक्त |
| | २२ | उस्मानाबाद | ६३६७ | रुपये त्रेसष्ठ लक्ष सदुसष्ठ हजार फक्त |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २३ | लातूर | २८५२० | रुपये दोन कोटी पंच्याऐंशी लक्ष वीस हजार फक्त |
| अमरावती | २४ | बुलढाणा | १४६२२० | रुपये चौदा कोटी बासष्ठ लक्ष वीस हजार फक्त |
| | २५ | अकोला | २३१०२ | रुपये दोन कोटी एकतीस लक्ष दोन हजार फक्त |
| | २६ | वाशिम | १७१७३ | रुपये एक कोटी एकाहत्तर लक्ष त्र्याहत्तर हजार फक्त |
| | २७ | अमरावती | २२४३७ | रुपये दोन कोटी चोवीस लक्ष सदतीस हजार फक्त |
| | २८ | यवतमाळ | २२८७५८ | रुपये बावीस कोटी सत्त्याऐंशी लक्ष अठ्ठावन्न हजार फक्त |
| नागपूर | २९ | वर्धा | ३३८४ | रुपये तेहतीस लक्ष चौ-याऐंशी हजार फक्त |
| | ३० | नागपूर | २७८९६ | रुपये दोन कोटी अठ्ठयाहत्तर लक्ष शहाण्णव हजार फक्त |
| | ३१ | भंडारा | १३१६० | रुपये एक कोटी एकतीस लक्ष साठ हजार फक्त |
| | ३२ | गोंदिया | १४७५ | रुपये चौदा लक्ष पंच्याहत्तर हजार फक्त |
| | ३३ | चंद्रपूर | ६१८ | रुपये सहा लक्ष अठरा हजार फक्त |
| | ३४ | गडचिरोली | ११५३ | रुपये अकरा लक्ष त्रेपन्न हजार फक्त |
| एकुण | | | १८२४००० | रुपये एकशे ब्याऐंशी कोटी चाळीस लक्ष फक्त |

(पां. रा. खोटरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

Scanned by CamScanner